# मे. न्यायाधीश सहकारी न्यायालय, अहमदनगर यांचे न्यायालयात.

(मा. श्री. बी. एस. लखोटे - न्यायाधीश यांचे समक्ष)

**दावा क्रमांक १५४/२०२२**

१) श्री.श्रीपाद पांडूरंग खिस्ती
व इतर. **---- वादी**

***विरुध्द***

१) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
व इतर. **---- प्रतिवादी**

**<u>निशाणी-७ वरील आदेश</u>**

१) वादीने सदरचा अर्ज दावा दाखल करण्यास झालेला पाच दिवसांचा विलंब माफ करण्याकरिता केला असुन, वादीचे कथन आहे की, वादीला दावा दाखल करण्यास आवश्यक ती कागदपत्रे मिळण्यास उशिर झाल्यामुळे सदरचा दावा दाखल करण्यास पाच-सहा दिवसांचा उशिर झाला आहे. वादीने दावा दाखल करण्यास जाणिवपूर्वक उशिर केला नसुन वादी यांना दाव्याबाबत असणारी कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने तसेच निवडणूक वाद न्यायालयाकडे दाखल करावा लागतो या विषयाचे ज्ञान नसल्याने दावा दाखल करण्यास विलंब झाला. सदरचा झालेला विलंब माफ करणे नैसर्गिक न्यायानुसार आवश्यक आहे.

२) वादीच्या या अर्जाला प्रतिवादी क्र. ४, ६, ८, ११ ते १४ यांनी उत्तर दाखल करुन कथन केले की, वादीचा अर्ज योग्य स्वरुपात नसुन अर्जाला प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही. वादी यांना दाव्यातील माहिती प्रथम पासुनच मात्र त्यांनी वेळेत दावा दाखल केला नाही. वादी यांनी प्रथम दावा दाखल करुन त्यानंतर उशिराने विलंब माफीचा अर्ज दाखल केला. वादीने त्यांच्या अर्जात झालेल्या विलंबाबबात योग्य, रास्त कारण दिले नाही, तसेच कागदपत्रे दाखल केली नाहीत. भारतीय पुरावा काद्यानुसार प्रत्यक दिवसाचा झालेल्या उशिराबाबत पुराव्यानिशी कारण नमुद करणे आवश्यक आहे. वादीने दाखल केलेला अर्ज विनाकारण असल्याने फेटाळण्यात यावा.

३) वादी आणि प्रतिवादी यांच्या कथनानुसार खालील मुद्दा उपस्थित होतो.

१) वादीने दावा दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याकरिता योग्य कारण नमुद केले आहे काय? आणि वादीचा अर्ज मंजुर करणे योग्य आहे काय?

## कारणमिमांसा

४) वादीच्या म्हणण्यानुसार दावा दाखल करण्यास त्यांना पाच-सहा दिवसांचा विलंब झाला आहे कारण त्यांना कागदपत्रे मिळण्यास उशिर झाला याउलट प्रतिवादीने वादीचे म्हणणे नाकारले असुन निवेदन केले आहे की, वादीला दाव्यातील माहिती पूर्वीपासून होती आणि दाव्यात योग्य आणि पुरेसे कारण नमुद केले नाही. वादीने अर्जातील कारण सिध्द करण्याकरिता अर्जाच्या समर्थ निशाणी-५० कडे शपथपत्र दाखल केले आणि त्यामध्ये अर्जात नमुद केलेले कारणांचा उल्लेख केला.

प्रतिवदी क्र. ४, ६ ते ८ आणि ११ ते १४ चे वकील श्री.आंबेकर यांनी उलटतपास घेतला. अर्जाच्या अनुषंगाने मुद्दा निर्माण होतो की, वादीने अर्जात नमुद केलेले कारण विलंबमाफीसाठी योग्य आहे काय? वादीचे वकील श्री. गुंड पाटील यांनी युक्तिवाद केला की, दावा दाखल करण्यास केवळ पाच दिवसांचा विलंब झालेला आहे कारण वादींना निवडणूक वाद हा न्यायालयात दाखल करावा लागतो याची माहिती नव्हती. तसेच निवडणूक कागदपत्रे वादींना उशिरा मिळाले. याउलट प्रतिवादीचे वकील श्री.आंबेकर यांनी युक्तिवाद केला की, वादीच्या अर्जामध्ये कोणतेही पुरेसे आणि योग्य कारण नमुद नाही. तसेच विलंब माफीसाठीचा कालावधी हा महत्वाचा नसुन दिलेले कारण योग्य आहे किंवा नाही हे महत्वाचे आहे. वादी हे माजी चेअरमन असुन ते संस्थेचे संचालक मंडळाचे सभासदसुध्दा असुन त्यामुळे त्यांना निवडणूक प्रक्रियेबद्दल माहिती आहे. कलम ९१ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियममध्ये विलंब माफी करण्याकरिता कोठेही उल्लेख नाही.

५) वादी आणि प्रतिवादी यांचे वकीलांनी केलेला युक्तिवादाचे तथ्य तपासणी करणेकरिता वादीने अर्जात नमुद केलेले कारण आणि दाव्यात दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करणे आवश्यक आहे. वादीचा अर्ज हा दोन कारणांच्या आधारे दाखल केला असुन, पहिले कारण वादीने नमुद केले की, त्यांना निवडणूक कागदपत्रे उशिरा मिळाली आणि निवडणूक वाद न्यायालयात दाखल करावा लागतो याची त्यांना जाणिव नव्हती. वादीने दाव्यासोबत दि.१५/०६/२०२२ रोजीचा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे कागदपत्रे मिळण्याकरिता अर्ज केलेल्याचे दिसुन येते. परंतु या

अर्जानुसार वादीला कागदपत्रे किती दिवसात मिळाले याचा उल्लेख अर्जात नाही. परंतु ही बाब स्पष्ट आहे की, वादी क्र.१ यांनी निवडणूक अधिकाऱ्याकडे निवडणूक कागदपत्रे मिळण्याकरिता अर्ज दाखल केला होता. दाव्यातील कथनावरुन ही बाब स्पष्ट आहे की, प्रतिवादी संस्थेचा निवडणूक निकाल निवडणूक अधिकाऱ्याने दि.२०/०५/२०२२ रोजी जाहीर केला. कलम ९२ (१) (डी) महाराष्ट्र सहकारी संस्था अधियमान्वये निवडणूक वाद हा निवडणूक निकालाच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या आत दाखल करणे आवश्यक आहे. वादीने सदरचा दावा दि.२६/०७/२०२२ रोजी दाखल केल्याचे दिसुन येते. म्हणजेच वादीने निवडणूक वाद दावा हा दि.२०/०७/२०२२ पूर्वी दाखल करणे आवश्यक होते आणि वादीने दि.२६/०७/२०२२ रोजी दावा दाखल केल्यामुळे पाच दिवसांचा विलंब झाल्याचे स्पष्ट होत आहे.

६) वादीला कागदपत्रे वेळेत न मिळाल्यामुळे त्यांना दावा दाखल करण्यास विलंब झाला ही बाब स्विकारणे योग्य आहे. त्यामुळे वादीने अर्जात दिलेले कारण माझ्या मते पूरेसे आहे. प्रतिवादीचे वकील श्री.आंबेकर यांनी त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थ मा.उच्च न्यायालय, चंद्रकांत पाटील विरुध्द विकास बालाजी पारसेवार याचिका क्र.१४२३/२०१० दि.२४/०९/२०१० या न्यायनिवाडयाची प्रत दाखल केली. यामधील वस्तुस्थितीचे निरिक्षण केले असता दिसुन येते की, या केसमध्ये १ वर्ष २ महिने १४ दिवसांचा अर्ज दाखल करण्यास विलंब झाला होता आणि त्यामध्ये अर्जदाराने योग्य ते पूरसे कारण न दिल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.१४२३/२०१० फेटाळली. परंतु प्रस्तुत प्रकरणात केवळ पाच दिवसांचा विलंब झालेला आहे आणि हा विलंब

शुल्लक आहे आणि त्याकरिता वादीने पुरेसे कारणसुध्दा नमुद केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादीने दाखल केलेल्या मा.उच्च न्यायालयाच्या न्यानिवाडयाला मान देऊन सदर केसमधील वस्तुस्थिती प्रस्तुत वादीच्या अर्जातील वस्तुस्थितीला लागून कलम ९२ (३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमानुसार वादीने दावा दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याकरिता योग्य ते पुरेसे कारण दिल्यास न्यायालयाला झालेला विलंब माफ करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे मला प्रतिवादीचे वकील श्री.आंबेकर यांनी केलेल्या युक्तिवादात तथ्य दिसुन येत नाही. वादीने दाखल केलेला दावा हा निवडणूक स्वरुपाचा असुन अर्जात नमुद केलेले कारण स्विकारणे योग्य आहे आणि वादीस दावा दाखल करण्यास झालेला पाच दिवसांचा विलंब माफ करणे योग्य आहे.

करिता वरील कारणास्तव वादीचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे आणि त्यानुसार मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

**आ दे श**

१) वादीचा अर्ज रु.३००/- खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२) वादीला दावा दाखल करण्यास झालेला पाच दिवसांचा विलंब माफ करण्यात येत आहे.

स्थळ : अहमदनगर
दिनांक : २९/११/२०२२

(बी.एस.लखोटे)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, अहमदनगर.